अवतीभवती

साखरा : हिवरखेडा येथे रूपाली केशव मगर यांचा सत्कार करताना ग्रामस्थ.

रूपाली मगर यांची पोलिस पाटीलपदी निवड

साखरा : सेनगाव तालुक्यातील हिवरखेडा येथील पोलिस पाटीलपदी रूपाली केशव मगर यांची निवड झाली. मंगळवारी (ता. दहा) ग्रामस्थांच्या वतीने मिरवणूक काढून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर रुपाली मगर यांचा सत्कार करण्यात आला. गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिस पाटलावर असते. मात्र, हिवरखेडा गावात हा मान एका महिलेने कर्तृत्वाने मिळवला असून गावात प्रथमच महिला पोलिस पाटीलपदी निवड झाली आहे. दोन हजार लोकसंख्या असलेल्या गावात दहा वर्षांपासून पोलिस पाटील पद रिक्त होते. पद रिक्त असल्याने ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत होता. रूपाली मगर यांचे माहेर कळमनुरी तालुक्यातील मसोड असून त्यांनी एम.कॉम. पर्यंत शिक्षण घेतले आहे.

कळमनुरी : महिला सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिवादन करण्यात आले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

कळमनुरी : येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी (ता.१०) सामाजिक महिला कार्यकर्त्या व समता परिषदेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वनिता गुंजकर, उज्ज्वला सोनुने, आशा सदावर्ते, अनुराधा गुंजकर, अरुणा गुंजकर, रुक्मिणी गुंजकर, लक्ष्मी गुंजकर यांच्यासह महिला सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

वसमत येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

वसमत : पहिल्या महिला शिक्षिका व स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी (ता. दहा) वसमत येथे अभिवादन करण्यात आले. नशामुक्त भारत अभियान अंतर्गत नशामुक्त भारत अभियान समिती, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या वतीने येथील गंगाप्रसाद अग्रवाल सर्वोदय कार्यालयात अभिवादन कार्यक्रम पार पडला. स्त्रीमुक्ती व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. महात्मा ज्योतिराव फुले यांना हाती घेतलेल्या समाजोद्धाराच्या कार्याला त्यांनी तितक्याच जिद्दीने पुढे नेले. त्या काळातील प्रतिकूल सामाजिक परिस्थितीतही त्यांनी सहा मुलींना घेऊन देशातील पहिल्या मुलींच्या शाळेची स्थापना करून शिक्षणाचा नवा अध्याय सुरू केला. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, राम जाधव, सुभाष कुंभारकर, ज्ञानेश्वर वाकळे आदी उपस्थित होते.

वसमत : शासकीय विश्रामगृहात जनता दरबारामध्ये नागरिकांचे प्रश्न सोडविताना आमदार राजू नवघरे. यावेळी उपस्थित नागरिक.

तुम्ही जनतेचे सेवक, जनतेची कामे वेळेत करा : आमदार राजू नवघरे

वसमत, ता. १० (बातमीदार) : तुम्ही जनतेचे सेवक आहात. नागरिकांची कामे वेळेवर करा आणि त्यांना विनाकारण शासकीय कार्यालयांच्या चकरा मारण्यास भाग पाडू नका. नियमानुसार असलेली कामे तत्काळ पूर्ण करा, अशा सूचना आमदार राजू नवघरे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

सोमवारी शासकीय विश्रामगृहात आमदार नवघरे यांनी जनता दरबार घेतला. यावेळी शहरासह ग्रामीण भागातील महिला, अपंग, वृद्ध, तरुण तसेच नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने आपल्या समस्या व अडचणी घेऊन उपस्थित झाले होते. आमदार नवघरे यांनी सर्वांशी आपुलकीने संवाद साधत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देऊन प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर जनता दरबारात तोडगा निघत असल्याने नागरिकांना दिलासा मिळत आहे. त्यामुळे नागरिकांतून या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. जनता दरबारात घरकुल, वीज वितरण, महसूल विभाग, पोलिस प्रशासन, वैद्यकीय सेवा आदी विविध विभागांशी संबंधित समस्या मांडण्यात आल्या. आमदारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्या तात्काळ सोडवण्याच्या सूचना दिल्या.

बीएलओंच्या बैठकीला गैरहजर; ३० अधिकाऱ्यांना देणार नोटीस

कळमनुरी, ता. १० (बातमीदार) : कळमनुरी व औंढा तालुक्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची मतदार यादी पुनर्निरीक्षणाबाबत मंगळवारी (ता. १०) बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत मतदार यादी पुनर्निरीक्षणाचे काम दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना केल्या. येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते, तहसीलदार जीवकुमार कांबळे, निवडणूक विभागाच्या नायब तहसीलदार वैशाली रंजवे, शैलेश वाईकर आदी उपस्थित होते.

बैठकीच्या पहिल्या सत्रात कळमनुरी तालुक्यातील २०५, तर दुसऱ्या सत्रात औंढा तालुक्यातील ८२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी प्रगती चोंडेकर यांनी मतदार यादी ही लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा आधार असल्याचे सांगत या कामात कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, असे स्पष्ट केले.

प्रत्येक बीएलओने आपल्या मतदान केंद्राच्या कार्यक्षेत्रात घरोघरी जाऊन माहिती तपासून आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात. तसेच नागरिकांना मतदार नोंदणीबाबत जागरूक करावे, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत सर्व बीएलओंना नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच काम करताना येणाऱ्या अडचणींबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, कळमनुरी व औंढा तालुक्यातील एकूण २८७ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांपैकी २५७ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. गैरहजर राहिलेल्या ३० बीएलओंना कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली.

मजुरांच्या टंचाईमुळे 'हार्वेस्टर'लाच पसंती

गव्हाची सोंगणी : महिला मजुरांना ५०० रुपये रोजंदारी देऊनही मनुष्यबळ मिळेना

गिरगाव, ता. १० (बातमीदार) : परिसरात सध्या गव्हाच्या सोंगणीच्या कामांना चांगलाच वेग आला आहे. वाढता उन्हाचा तडाखा आणि मजुरांची तीव्र टंचाई यामुळे शेतकरी पारंपरिक पद्धतीऐवजी आधुनिक हार्वेस्टर यंत्राद्वारे काढणी करण्याला प्राधान्य देत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे वेळ आणि श्रमाची मोठी बचत होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

सध्या गव्हाच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. पूर्वी गव्हाची सोंगणी करण्यासाठी मजुरांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, आता मजूर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. वाढत्या उन्हामुळे शेतात काम करण्यास मजूर कचरत असून, महिला मजुरांना ५०० रुपये रोजंदारी देऊनही मनुष्यबळ मिळत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे शेतकरी हार्वेस्टरच्या माध्यमातून काही तासांतच सोंगणी व मळणीची कामे पूर्ण करत आहेत. परिणामी आगामी काही दिवसांत परिसरातील गव्हाचा हंगाम संपण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

एकरी दोन हजार रुपये दर

गिरगावसह परजना, खाजमापुर वाडी, सोमठाणा, पार्डी बुद्रुक, डिग्रस खुर्द आदी भागात इसापूर धरणाच्या पाण्यावर रब्बी हंगामात गहू पेरणी करण्यात आली होती. गहू काढणीस आल्याने या भागात पंजाब व हरियाणा राज्यांसह स्थानिक हार्वेस्टर यंत्रधारक दाखल झाले आहेत. यंत्राद्वारे काढणीसाठी एकरी सुमारे दोन हजार रुपये खर्च येत असल्याने उत्पादन कमी आणि खर्च अधिक होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. सध्या गिरगाव परिसरात गहू तसेच हरभरा पिकाची काढणी सुरू असून काढणीसाठी एकरी दोन हजार रुपये दर घेत असल्याचे यंत्रधारक विनायक कऱ्हाळे यांनी सांगितले.

गिरगाव : परिसरात हार्वेस्टर यंत्राद्वारे गहू काढताना शेतकरी.

विद्यार्थिनींनी घेतली भरोसा सेलची माहिती

कळमनुरी, ता. १० (बातमीदार) : कै.डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय, कळमनुरी अंतर्गत लोकप्रशासन विभागाच्या वतीने सोमवारी (ता. नऊ) महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी हिंगोली येथील पोलिस विभागाच्या भरोसा सेल व दामिनी पथक कार्यालयाला शैक्षणिक भेट देत तेथील कामकाजाची माहिती घेतली. यावेळी पोलिस अधिकाऱ्यांनी भरोसा सेलचे कार्य स्पष्ट करत विद्यार्थिनींच्या विविध शंकांचे निरसन केले.

प्राचार्य डॉ. पंडित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भेटीचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.डॉ. सुरेखा शिंदे, प्रा.डॉ. डी.के. खोकले व प्रा. प्रतिभा नरवाडे यांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाअंतर्गत असलेल्या भरोसा सेल कार्यालयाला भेट दिली. यावेळी भरोसा सेल व दामिनी पथकाच्या प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक प्रेमलता गोमासे, उपनिरीक्षक शेख, जाधव, आरती साळवे, वर्षा शिंदे व सीमा यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. भरोसा सेलअंतर्गत चालणारे कामकाज, महिलांवरील अन्याय, कौटुंबिक वाद, छळ तसेच सायबर गुन्हे यांसारख्या प्रकरणांमध्ये पोलिस प्रशासनाची भूमिका याविषयी त्यांनी माहिती दिली. प्रेमलता गोमासे यांनी विद्यार्थिनींना पुस्तकी ज्ञानाबरोबरच समाजातील समस्याग्रस्त महिलांमध्ये अन्यायाविरोधात कायदेशीर बाबींविषयी जनजागृती करणे ही प्रत्येक विद्यार्थिनीची जबाबदारी असल्याचे सांगितले. हे कार्य समाजसेवेचे एक महत्त्वाचे माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थिनींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. भेटीद्वारे पोलिस प्रशासनाच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने विद्यार्थिनींनी समाधान व्यक्त केले.

कळमनुरी : पोलिस अधिकाऱ्यांकडून माहिती घेताना डॉ. शंकरराव सातव महाविद्यालयातील विद्यार्थिनी.

आपले सेवा केंद्राची निवड प्रक्रिया वादात; ग्रामस्थांनी केल्या तक्रारी

हिंगोली, ता. १० (बातमीदार) : जिल्ह्यात नव्याने स्थापन केल्या जाणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राथमिक निवड यादीत गावातील मुळ रहिवासी नसलेल्यांची निवड झाल्याने मंगळवारी (ता. दहा) जिल्हा प्रशासनाकडे तक्रारींचा पाऊसच सुरू झाला. दुपारपर्यंत ५० पेक्षा अधिक गावकऱ्यांनी तक्रार दाखल केल्याने आता ही प्रक्रियाच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

जिल्ह्यात ४३० आपले सरकार सेवा केंद्रासाठी २२ डिसेंबर २०२५ रोजी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार तीन हजार अर्ज जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाले होते. त्यानंतर झालेल्या छाननीमध्ये १८६१ जण मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात तीन ते १२ फेब्रुवारी कालावधीत मुलाखती घेण्यात आल्या. त्यानंतर सोमवारी प्राथमिकदृष्ट्या निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, जिल्ह्यातील पाचही तालुक्यांमधून प्रसिद्ध झालेल्या यादीमध्ये आपले सरकार सेवा केंद्रासाठी निवड झालेल्या उमेदवारांची नावे पाहून त्या गावातील मूळ रहिवासी असलेल्या उमेदवारांवर डोळे पांढरे करण्याची वेळ आली. गावातील मूळ रहिवासी नसलेल्या उमेदवारांची त्या गावासाठी निवड झाल्याने इच्छुक उमेदवारांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

काही ठिकाणी उमेदवारांना शैक्षणिक कागदपत्रांच्या मुळ प्रत, डिग्रीच्या मुळ प्रत, या शिवाय रहिवासी प्रमाणपत्र मागविण्यात आले. तर काही जणांनी चक्क भाडेकरारनामा सादर करून आपण त्या गावात किरायाने राहत असल्याचे दाखविले आहे.

नैराश्यातून तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सेनगाव, ता. १० (बातमीदार) : तालुक्यातील गणेशपूर शिवारात नैराश्यातून तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात सोमवारी (ता. नऊ) रात्री उशिरा अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

बुलडाणा जिल्ह्यातील खंडाळा देवी येथील अशोक महाजन (वय ३५) हे आजारी होते. मागील काही दिवसांपासून ते सासुरवाडी गणेशपूर येथे राहण्यासाठी आले. गणेशपूर शिवारात रोजमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरी पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. दरम्यान, रविवारी अशोक पत्नीसह उपचारासाठी दवाखान्यात गेले होते. त्या ठिकाणावरून सायंकाळी घरी परतले. त्यानंतर सोमवारी सकाळीच अशोक घराबाहेर पडले. मात्र, सकाळी आठपर्यंत ते घरी परतले नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरु केला होता. यावेळी गणेशपूर ते भानखेडा मार्गावर गणेशपूर शिवारातील एका शेतात चिंचेच्या झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी घटनास्थळी गर्दी केली. सेनगाव पोलिस ठाण्याचे साहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के, जमादार जीवन मस्के, अमोल चिकने, सुभाष जाधव, किशोर कातकडे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. उत्तरीय तपासणी करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. लक्ष्मीबाई महाजन यांच्या तक्रारीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. जीवन मस्के पुढील तपास करीत आहेत.

शॉर्टसर्किटमुळे जळाला पाच हेक्टरवरील गहू

हिंगोली, ता. १० (बातमीदार) : तालुक्यातील बासंबा येथे विजेच्या खांबावरील तारांचा परस्पर स्पर्श होऊन झालेल्या शॉर्टसर्किटमुळे शेतातील गव्हाच्या पिकाला आग लागून पाच हेक्टर क्षेत्रावरील पीक जळून खाक झाले. यात तीन लाखांचे नुकसान झाले असून २० स्प्रिंकलर पाइपही खाक झाले. ही घटना सोमवारी (ता. नऊ) दुपारी घडली.

सोमवारी दुपारी शेतातून ओढलेल्या विजेच्या तारांमुळे आग लागली. यात गट क्रमांक १६७ मधील शेतकरी आनंदराव सखाराम ढाले यांच्या एक हेक्टर क्षेत्रावरील गव्हाचे पीक, कैलास सखाराम ढाले यांच्या दोन एकर तीन गुंठे, श्यामराव सखाराम ढाले यांच्या दोन एकर तीन गुंठे तसेच सुमनबाई अंकुश ढाले यांच्या दोन एकर तीन गुंठे क्षेत्रावरील गहू जळून खाक झाला. याशिवाय अमृता पुंजाराव ढाले यांच्या शेतात ठेवलेले सुमारे २० स्प्रिंकलर पाइप जळून सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाले.

आगीची माहिती मिळताच शेतकरी व गावकऱ्यांनी जेसीबी, ट्रॅक्टर तसेच अग्निशामक दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

सराईत गुन्हेगार तीन महिन्यांसाठी हद्दपार

हिंगोली : कळमनुरी पोलिस ठाणे हद्दीतील कोंढूर येथील सराईत गुन्हेगार ज्ञानेश्वर दादाराव पतंगे याला तीन महिन्यांसाठी हिंगोली जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले असल्याची माहिती पोलिस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी दिली.

ज्ञानेश्वर पतंगे याच्यावर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असून त्याच्या गुन्हेगारी वर्तनात सुधारणा होत नसल्याचे निदर्शनास आले होते. सामाजिक स्वास्थ्य अबाधित राहावे या दृष्टीने कळमनुरी पोलिसांनी त्याला हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्यामार्फत उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे सादर केला होता.

उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी प्रस्तावाचे परीक्षण करून ज्ञानेश्वर पतंगे याला तीन महिन्यांसाठी हिंगोली जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.

सवना ग्रामपंचायतीची इमारत लवकरच कार्यान्वित होणार

सवना : गावाच्या विकासकामांसह ग्रामस्थांच्या विविध प्रशासकीय कामांचा कारभार ग्रामपंचायतीमार्फत चालत असतो. मात्र, सवना येथील ग्रामपंचायत इमारत अनेक वर्षांपासून जीर्ण अवस्थेत होती.

ग्रामपंचायतीच्या जुन्या इमारतीची दुरवस्था लक्षात घेता काही महिन्यांपूर्वी नवीन ग्रामपंचायत इमारतीस मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार नव्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच ग्रामपंचायतीचा कारभार नव्या इमारतीतून सुरू होणार आहे. नवीन इमारतीमुळे ग्रामस्थांना विविध प्रशासकीय सेवा अधिक सुलभ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रथम वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

कु. कनिष्का नितेश मकासरे

11/03/2026

सौ. करुणा नितेश मकासरे (मम्मी -पप्पा)
सौ. गुंफाबाई घनशाम मकासरे (आजी -आजोबा)

शुभेच्छुक

चि. विकास मकासरे (काका)
चि. शिवम दिलीप झरे
कु. प्रतीक्षा दिलीप झरे , अश्विनी दिलीप झरे
चि. करण, कु. शुभांगी, कु. प्रेरणा कैलास जावळे

समस्त मकासरे परिवार जयपूर व
सांची बुद्ध विहार मित्र मंडळ जयपूर
ता. सेनगाव जि. हिंगोली

हिंगोलीच्या उपनगरांमध्ये कचऱ्याचे साम्राज्य

हिंगोली : स्वच्छ भारत अभियानाच्या गप्पा मारल्या जात असल्या तरी, हिंगोलीतील अनेक उपनगरांमध्ये कचऱ्याचे ढीग साचलेले पाहायला मिळत आहेत. साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. नाल्यांची सफाई वेळेवर होत नसल्याने सांडपाणी रस्त्यावर येत आहे. आम्ही नियमित कर भरतो, तरीही आम्हाला अस्वच्छतेत राहावे लागत आहे, अशी तक्रार रहिवाशांनी केली आहे. नगरपालिकेने स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून कचरा उचलण्याची यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज आहे, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो.

शक्तिपीठ मार्गातून ४० हजार कोटींवर डल्ला : सपकाळ

हिंगोली, ता. १० (बातमीदार) : राज्यात एकीकडे शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी उद्ध्वस्त होत असताना दुसरीकडे फडणवीस सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या माध्यमातून ४० हजार कोटी रुपयांवर डल्ला मारण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

हिंगोली येथील महात्मा गांधी चौकात संघर्ष पदयात्रेनंतर आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी माजीमंत्री शिवाजीराव मोघे, प्रदेश पदाधिकारी मोहन जोशी, सचिन नाईक, जिल्हा प्रभारी साहेबराव कांबळे, जिल्हाध्यक्ष सुरेश सराफ, गजानन देशमुख, विनायक देशमुख, मिलिंद उबाळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

सपकाळ म्हणाले, राज्यात शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी उद्ध्वस्त होत आहे. शेतकऱ्यांचा आक्रोश शासनापर्यंत पोचत नाही. शेतकरी, कष्टकरी व महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात येत असून, आगामी काळात प्रत्येक जिल्हा व तालुक्यात पोचणार आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधीचा अपव्यय होणार असल्याचा आरोप करत स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी, शेतमालाला हमीभाव, संपूर्ण कर्जमाफी व शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली

मोकाट कुत्र्यांमुळे भीतीचे वातावरण

हिंगोली: शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत भटक्या कुत्र्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेषतः पहाटे आणि रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांच्या अंगावर कुत्री धावून जात असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या आठवड्यात शहरात दोन लहान मुलांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना समोर आली असून, जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कचरा कुंडीपाशी कुत्र्यांचा वावर जास्त असल्याने परिसरातून चालणे कठीण झाले आहे. प्रशासनाने कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००) कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ **प्रोप्रायटर श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५	१. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम -** सावली रोड, **दक्षिण -** शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर -** रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता, **पश्चिम -** रस्ता, **उत्तर -** श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण -** श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317**	**अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु.३०,८३,४०२.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा**	**१. अ) रु. १९.३३ लाख ब) रु. १.९३३ लाख (२७.०३.२०२६) क) रु. ०.१० लाख** **१. अ) रु. १०.४८ लाख ब) रु. १.०४८ लाख (२७.०३.२०२६) क) रु. ०.१० लाख**	**दि. २७.०३.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **27.03.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाटी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - १०.०३.२०२६
स्थळ - नाशिक

स्वाक्षरी/-
श्री. वेंकेटेश एस.
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य